


दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | बुधवार २५ सप्टेंबर २०२४ | अंक २९१ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# नवव्या दिवशी मनोज जरांगेंचं उपोषण स्थगित; जरांगे पाटीलांचं मराठा बांधवाना आवाहन काय?

## जातीवादावर जरांगे काय म्हणाले?

मी जातीयवादी मग माधव पॅटर्न आणला तो जातीयवाद नव्हता का? तू आंदोलन संपू दे तुझा जातीयवाद संपवतो. जातीयवाद वाढू नये जेवढी जबाबदारी मराठ्यांची आहे, तेवढीच ती त्यांची आहे. आपल्या आंदोलन मुळे नोंदी सापडल्या, मुलींना मोफत शिक्षण मिळाले. फडणवीस यांना वाटत असेल खड्डे भरून निघेल, भरून निघणार नाही. विदर्भ मराठवाडा, आणि पश्चिम महाराष्ट्रमधील मराठे एक आहेत. एकाही नेत्याच्या सभेला जायचे नाही. कोण्या नेत्याने दबाव आणला लोकसभेला जसे मराठ्यांनी केले तसे करायचे, असं जरांगे म्हणाले.



उपोषणाच्या नवव्या दिवशी मनोज जरांगे यांनी उपोषण स्थगित केलं आहे. यावेळी त्यांनी मराठा बांधवांना संबोधित केलं. हे करून मला बदनाम करू शकतात. मला हे मॅनेज करू शकत नाही. त्यांचे फोन येतात. पण मी म्हणतो. आरक्षण घेऊन येत असाल तर या.... नाही तर मी घोडे लावत असतो. इथे पडून राहू शकत नाही. पुन्हा अंतरवाली आलो की भेटू. मला हॉस्पिटलमध्ये भेटायला येऊ नका. तुम्हाला संधी आहे फडणवीस साहेब... मराठा आणि कुणबी एकच आहेत. फडणवीस यांनी मंत्री यांना काम करू द्यावे. आचारसंहिता संपेपर्यंत आपल्या मागण्या मान्य झाल्या नाही तर खचून जाऊ नका. हात जोडून सांगतो लेकरांचे वाटोळे होऊ देऊ नका, असं जरांगे म्हणाले. जरांगेंचं उपोषण स्थगित राज्यभरातून मराठा समाज अंतरवालीकडे येत आहेत. त्यामुळे आता मनोज जरांगे पाटील 4 वाजता उपोषण सोडणार आहेत. त्यांनी त्यांचं उपोषण स्थगित केलं आहे. मनोज जरांगे पाटील गावातील महिला आणि नारायणगडाचे महंत शिवाजी महाराज यांच्या हाताने 4 वाजता उपोषण सोडणार आहेत. पावसात लोक अंतरवलीत येत आहेत वाईट वाटत आहे. काल प्रचंड त्रास होत होता. पाच सात सलाईन लावले. रास्ता नाही आणि मुसळधार पाऊस सुरू आहे. चिखलाचा रस्ता आहे. आपण कुणाला दाखवण्यासाठी नाही तर देवेंद्र फडणवीस यांना संधी देण्याचे आंदोलन आहे. 83 क्रमांकावर मराठा कुणबी आहेत, सरसगट मराठा समाजाला ओबीसी आरक्षण द्या. राजकारण्याला आणि त्यांच्या मुलाला मोठे करू नका. पक्ष, सत्ताधाऱ्यांनी धोका दिला तरी, मराठा समाजाने आपल्या जातीशी आणि लेकराशी धोका करू नका. तुमच्या हाताने तुमची सत्ता पाडू नका. कालचा दिवस माझ्यासाठी वाईट होता, महिला मी उपचार घ्यावे म्हणून ओरडत होत्या, असे वाटत होते. पुन्हा उपोषण करू नये, असं जरांगे यावेळी म्हणाले.



# सरकारला असलेला सत्तेचा माज, मराठा समाज उतरवणार:- राजेंद्र आमटे

## समाजाला जरांगे पाटीलच्या निस्वार्थी नेतृत्वाची गरज

**बीड प्रतिनिधी :-**

बीड (प्रतिनिधी) सर्व सामान्य गोर-गरीब मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून उपोषण केले सरकारने संपूर्ण मराठा समाजाला सखे सोयरे बाबत आदेश काढू असा शब्द देऊनही सरकार चाल धकल करत आहे. सरकारच्या मंत्र्याने देलेला आरक्षणाचा शब्द पाळत नसल्या या मुळे मनोज दादा जरांगे पाटील यांनी अंतरवली सराटी येथे उपोषण सुरू केले

परंतु दळभद्री सरकार हे फक्त निवडणुकीत होणाऱ्या मताच्या बेरजेच्या विचारात आहे मनोज दादा जरांगे पाटील यांच्या न्याय हक्का मागणीसाठी केलेल्या आंदोलनाकडे दुर्लक्ष करत आहेत हे दुर्लक्ष फक्त सरकला सत्तेचा माज आहे आणि मराठा समाज सरकला सत्तेवरून पायउतार करून सरकारचा माज उतरवणार आहे . मनोज दादा जरांगे पाटील यांच्या सारख्या निस्वार्थी नेतृत्वाची गरज आहे जरांगे पाटील यांनी समाजाच्या अग्रहा मुळे उपोषण सोडले आहे आज आरक्षण केव्हा हि मिळवता येईल पण समजा साठी संघर्ष करणारे नेतृत्व टिकवणे काळाची गरज आहे मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून अण्णासाहेब पाटील, विनायकराव मेटे साहेब यांच्या सारख्या अनेक अनेक हिरे खर्ची पडले मनोज दादा जरांगे पाटील यांचं नेतृत्व टिकवणे ही समाजाची गरज आहे पाटलांनी तब्येतीची काळजी घ्यावी माजलेल्या सत्ताधीश सरकारचा माज उतरवायला मराठा समाज खंबीर आहे असे आवाहन शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे यांनी केले

# शेतकऱ्यांना शेतीसाठी मनरेगा अंतर्गत तार कंपाऊंडसाठी राज्यशासनाने निधी उपलब्ध करून द्यावा अ.भा.मराठा महासंघ

**बीड | प्रतिनिधी**

बीड प्रतिनिधी :- शासनाने आज पर्यंत मनरेगा अंतर्गत शेतकऱ्यांना विहीर शेत तलाव रस्ते आशा विविध योजना मनरेगा अंतर्गत दिल्या आहेत

परंतु आज शेतकऱ्यांच्या शेतातील आलेले पिक जंगली प्राणी हरिण ससा व रानडुक्कर पिकाची नासधूस करतात

व पिके खाऊन टाकतात त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे नुकसान होऊन शेतकरी आर्थिक संकटात सापडत आहे

त्या शेतकऱ्याला या संकटातून बाहेर काढण्यासाठी शेतीला मनरेगा अंतर्गत तार कंपाऊंड करण्यास अनुदान उपलब्ध करून देण्यात यावे



येणाऱ्या अधिवेशनात ही तरतुद करून आपण शेतकऱ्यांना विश्वास द्यावा की हे सरकार शेतकऱ्यांच्या सोबत आहे आणि कायम सोबत राहील नसता ही आमची शेतकऱ्यांसाठी शेतकरी हितासाठी केलेली मागणी मान्य नाही केली तर, अखिल भारतीय मराठा महासंघ बीड शेतकऱ्यांसाठी रस्त्यावर उतरेल असा इशारा अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने राज्य सरकारला देण्यात येतं आहे या वेळी निवेदन देताना, अखिल भारतीय मराठा महासंघाचे मराठवाडा उपाध्यक्ष नारायणराव थोरात सर बीड जिल्हा अध्यक्ष बापूसाहेब साळुंके पाटील विद्यार्थी जिल्हाध्यक्ष भागवत मस्के पाटील बीड जिल्हा उपाध्यक्ष अशोकराव जोगदंड बीड जिल्हा उपाध्यक्ष सुमंत खांडे सर शहराध्यक्ष दत्ता शेळके गवळवाडीचे सरपंच गणेश मस्के बेलखंडी पाटोदा सरपंच संदिपान बडगे डोकेवाडा कदमवाडी बेलखंडी पाटोद्याचे सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन अनिल माने पाटील कदमवाडीचे सरपंच राहुल कदम करचुंडीचे सरपंच सतीश शिंदे

निलेश जगताप पाली सर्कल प्रमुख रंजित शेळके व इतर मराठा महासंघाचे पदाधिकारी उपस्थित होते

# पाटोदा येथील जयभवानी महाविद्यालयास नॅकचा बी ग्रेड




**पाटोदा प्रतिनिधी:-**

येथील जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ गेवराई संचलित कला व विज्ञान महाविद्यालयास राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद (नॅक) ने बी (इ) ही श्रेणी ग्रेड प्रदान केला. प्राचार्य म्हणून कदम सर अभिनंदनाचा वर्ष व शुभेच्छा देताना.राहुल बामदाळे

पाटोदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक.मा.मझअर अली सय्यद साहेब, मा.गडकर साहेब अशोक बामदळे शिक्षकांची उपस्थिती होती..




# पर्यावरण संरक्षणात युवकांची भूमिका महत्त्वाची - डॉ. सुहास मोराळे

**दैनिक लोकआरंभ//**

माजलगाव प्रतिनिधी दिनांक २४/०९/२०२४ पर्यावरण संरक्षणात युवकांची भूमिका महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन सिद्धेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुहास मोराळे यांनी केली. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवसाच्या कार्यक्रमात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. मंचावर उपप्राचार्य डॉ. युवराज मुळये, कार्यक्रमाधिकारी डॉ. विकास बोरगावकर, डॉ. ज्ञानेश्वर गवते यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना प्राचार्य डॉ. सुहास मोराळे म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून युवक हा आपले व्यक्तिमत्व घडवत असतो. हे फक्त आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाचे माध्यम नव्हे तर राष्ट्रसेवा करण्याचे एक सक्षम माध्यम आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना चांगल्या सवयी त्यांच्या अंगी जोपासल्या जातात. हाच विचार करून भारत सरकारने सर्व महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना हा उपक्रम सुरू केला आहे व या माध्यमातून युवकांच्या अंगी विविध कलागुणांचा व कौशल्याचा विकास होत आहे. फक्त राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये प्रवेश घेतला आणि त्याचे १० गुण आपण मिळवणे हा त्याचा उद्देश नसून राष्ट्रीय कार्यामध्ये आपण सर्व युवकांनी झोकून देऊन काम केले पाहिजे. वेगवेगळ्या आपत्ती व्यवस्थापनामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक हे आपले बऱ्याच ठिकाणी आपले योगदान देताना दिसून येतात. विद्यार्थी जीवनामध्ये अविष्कार, अश्वमेध, इंद्रधनुष्य, आव्हान यासारख्या वेगवेगळ्या ऍक्टिव्हिटी विद्यार्थ्यांच्या चारित्रिक विकास घडवण्यासाठी विद्यापीठ प्रस्तरावर सुरू करण्यात आलेल्या आहेत. म्हणून आपण सर्व विद्यार्थ्यांनी या सर्व उपक्रमामध्ये हिरीरीने सहभाग नोंदवून आपला व्यक्तिमत्त्व विकास केला पाहिजे असे ते म्हणाले.

याप्रसंगी सर्व स्वयंसेवकांना राष्ट्रीय सेवा योजना विभागाची शपथ देण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. विकास बोरगावकर यांनी केले. सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ. ज्ञानेश्वर गवते यांनी केले तर आभार डॉ. सिताराम इंगोले यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी मेहनत घेतली.

# स्व. अण्णासाहेब पाटील यांनी माथाडी कामगारांच्या जीवनाला स्थैर्य मिळवून दिले - रमेश पोकळे

## वसंतराव काळे व संभाजी राजे महाविद्यालयात स्व. अण्णासाहेब पाटील यांची जयंती साजरी

**बीड (प्रतिनिधी)**

बीड दि. 25 (प्रतिनिधी) समाजातील सर्व जाती धर्मातील कष्टकरी, मजूर, माथाडी कामगारांना एकत्रित करून त्यांच्या न्याय हक्कासाठी स्व. अण्णासाहेब पाटील यांनी चळवळ उभी केली. या चळवळीच्या माध्यमातून माथाडी कामगारांना सेवा, आरोग्य, त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी तत्कालीन सरकारला माथाडी कायदा करायला लावून माथाडी कामगाराच्या जीवनाला स्थैर्य मिळवून देण्याचे महान कार्य स्व. अण्णासाहेब पाटील यांनी केले. असे प्रतिपादन संस्था अध्यक्ष रमेश पोकळे यांनी केले आहे.

येथील वसंतराव काळे कॉलेज ऑफ जर्नालिझम अँड कम्प्युटर सायन्स आणि संभाजी राजे कॉलेज ऑफ लायब्ररी अँड मॅनेजमेंट सायन्स बीड यांच्या संयुक्त विद्यमाने माथाडी कामगार नेते स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून रमेश भाऊ पोकळे हे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. बापूसाहेब शिंदे, तेजस शिंदे, हनुमान मुळीक, राहुल वायकर, संस्था सचिव गणेश पोकळे व प्राचार्य बप्पासाहेब हावळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना पोकळे म्हणाले की, समाजातील आर्थिक दृष्ट्या मागास असलेल्या सर्व जाती-धर्मातील विद्यार्थ्यांना शिक्षणात सवलती मिळाव्यात. तसेच मराठा समाजाला आरक्षण मिळावे. शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव मिळावा. माथाडी कामगारांना सेवा, आरोग्य सुविधा, अशा अन्य मागण्या घेऊन मुंबईमध्ये भव्य मोर्चा स्व. अण्णासाहेब पाटील यांनी काढला. परंतु शेतकऱ्यांच्या, विद्यार्थ्यांच्या, माथाडी कामगारांच्या विविध मागण्यांना तत्कालीन असंवेदनशील सरकार सकारात्मक प्रतिसाद देत नसल्यामुळे समाजाच्या विविध मागण्यासाठी स्व. अण्णासाहेब पाटील यांनी स्वतःचे बलिदान दिले. समाजातील तळागळातील लोकांच्या कल्याणासाठी त्यांनी अहोरात्र कार्य केले. या त्यांच्या कार्याला प्रेरणा म्हणून त्यांच्या नावाने आपण संस्था स्थापन केली. या संस्थेचे महाविद्यालय सुरू करून आज बीड शहरातील आणि ग्रामीण भागातील कष्टकरी, कामगार, गोरगरीब शेतकर्यांचे हजारो विद्यार्थी या महाविद्यालयाच्या माध्यमातून शिक्षण घेत आहेत. स्व. अण्णासाहेब पाटील यांना अभिप्रेत असणारे कार्य आमची संस्था नेहमी करत



राहिल असेही पोकळे म्हणाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. बापूसाहेब शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य बप्पासाहेब हावळे यांनी केले. यावेळी बोलताना त्यांनी स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि शेवटी आभार प्रा. शिवशंकर पटवारी यांनी मानले. या कार्यक्रमाला प्रा.सुहास गाढवे, प्रा. राजश्री महाजन, प्रा. शेख, महेश नेवडे, दीपक जाधव, इम्रान पठाण, सचिन चौरे, रसिका पाटील, प्रिती खडके,सौ. संध्या खोसे यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ग्रामपंचायत प्रशासनाच्या हलगर्जीपणा मुळे रामजी आंबेडकर नगरात कृत्रिम पाणी टंचाई - नागरिकांचा ग्रामपंचायतवर घागर मोर्चा

## सामान्य नागरिकांच्या समस्या सोडवणं होत नसेल तर सरपंच, उपसरपंच,सदस्यांनी राजीनामे द्यावेत- बालाजी पाटील सिरसाट

**नांदेड : प्रतिनिधी**

नांदेड : लोहा तालुक्यातील उमरा येथील नवीन वस्ती असलेल्या रामजी आंबेडकर नगर येथे भर पावसाळ्यात ग्रामपंचायत प्रशासनाच्या हलगर्जीपणा मुळे गेल्या पंधरा दिवसापासून कृत्रिम पाणी टंचाई निर्माण झाल्याने रहिवाशी नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली असून पाणी पुरवठा लवकर सुरळीत करून देण्याच्या मागणीचे निवेदन देण्यात आले आहे. लोहा तालुक्यातील उमरा हे सर्कलचे गाव आहे. तसेच पाच तांडे मिळून येथे गट ग्रामपंचायत असल्याने या गावासाठी शासनाचा मोठा निधी येतो मात्र म्हणावा तसा विकास झाला नाही. त्यातच भर पावसाळ्यात ग्रामपंचायत प्रशासनाच्या हलगर्जीपणा मुळे नवीन वस्ती असलेल्या रामजी




आंबेडकर नगरात गेल्या पंधरा दिवसापासून कृत्रिम पाणी टंचाई निर्माण झाली आहे. या बाबतीत गेल्या आठ दिवसांपूर्वी नागरिकांनी ग्रामविकास अधिकारी यांना प्रत्यक्ष भेटून बोअरची मोटार जळाली असून ती पूर्ववत करून आमची पाण्याची समस्या सोडविण्याची विनंती केली असता दोन दिवसात तुम्हाला पाणी पुरवठा सुरू करून देतो असे सांगितले होते.मात्र त्या घटनेला आज दहा दिवस झाले तरी पाणी पुरवठा झाला नाही, तसेच सरपंच यांनाही येथील नागरिकांनी भेट घेऊन आमच्या पाण्याचा प्रश्न सोडावा अशी मागणी केली असता, मी तुम्हाला पाणी पाजऊ का ? असा प्रति सवाल करून मी तुमच्या पाण्याची व्यवस्था करणार नाही तुम्हाला काय करायचे आहे ते करा असे बोलून दाखवले असल्याचे या निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे वस्तीतील नागरिकांनी दि.२५- सप्टेंबर रोजी ग्रामपंचायत कार्यालयावर घागर मोर्चा काढून हे निवेदन संगणक कर्मचारी यांचे कडे सादर केले.यावेळी ग्रामपंचायत सदस्य सचिन सिरसाट, व पुंडलिक सिरसाट, पंजाब सिरसाट उपस्थित होते. मात्र यावेळी सरपंच व ग्रामविकास अधिकारी हे उपस्थित नव्हते. अनंत अडचणी व कामाचे दिवस असता भर पावसाळ्यात येथील मोलमजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या नागरिकांना मात्र पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली आहे. या निवेदनावर- माजी ग्रामपंचायत सदस्य- व्यंकटेश पट्टेकर, जेष्ठ नागरिक- पुंडलिक वाघमारे, माजी सरपंच- नागोराव पट्टेकर, माधव पट्टेकर, सुद्दोधन पट्टेकर, श्रीकांत पवार, परमेश्वर जोंधळे, चांदू वाघमारे, राजू वाघमारे, शोभबाई गवाले, सुलोचनबाई, संगीताबाई, सह वस्तीतील अनेकांच्या सह्या आहेत.व उपस्थित होते.

# बोंडगव्हाण सावरखेड येथे डास नियंत्रणाकरिता धूर फवारणी ..



श्रीक्षेत्र माहुर : अत्रिनंदन मोरे वातावरणातील बदलामुळे डासांची उत्पत्तीत वाढ झालेली आहे. त्यामुळे बोंडगव्हाण व परिसरात डेंग्यू, आदीसह व्हायरल आजारांचे प्रमाण वाढू नयेयेथे डास नियंत्रणाकरिता धूर फवारणी ! : वातावरणातील बदलामुळे डासांची उत्पत्तीत वाढ झालेली आहे. त्यामुळे व परिसरात डेंग्यू, आदीसह व्हायरल आजारांचे प्रमाण वाढलेले आहे. . याची ग्रामपंचायतीने दखल घेत गावभर यांत्रिक मशीनच्या माध्यमातून धुरळणी केली. पावसाळ्याचे दिवस असले तरी उष्ण दमट हवामानामुळे डासांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. पशुपालकांच्या घरी तर डासांची संख्या सुमार आहे. दाट लोकवस्तीत डास मोठ्या प्रमाणात आढळतात. डासांच्या नियंत्रणाकरिता आरोग्य विभाग व स्थानिक प्रशासनाने पाउले उचलत फॉगिंग मशीनच्या माध्यमातून धुरळणी केली. धुरळणीमुळे डासांच्या उत्पत्तीवर नियंत्रण येते. गावात धुरळणी सुरू आहे. यामुळे बोडगव्हाण सावरखेड येथे डासांची उत्पत्ती कमी होऊन रोगराई नियंत्रित करण्यासाठी मोठी मदत शक्य आहे. प्राथमीक आरोग्य केंद्र सिंदखेड अंतर्गत उपकेंद्र ग्रामपंचायत कार्यालयातर्फे धूर फवारणी करताना तालुका किनवट हिवताप कार्यालयातील कर्मचारी रमेश तोटावार,साई जोगदंड ,उपस्थित सरपंच सौ.मंगलाताई जयवंत तुमराम उपसरपंच सौ. गिताबाई विजय पाझारे,पंचायत समिती आरोग्य विस्तार अधिकारी आर एस.गावंडे,ग्रामपंचायत सदस्य तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थिती होती .

# श्री संत गजानन महाविद्यालयात रासेयोच्या वतीने वृक्षारोपण.





**खर्डा ( प्रतिनिधी )**

खर्डा येथील श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या श्री संत गजानन महाविद्यालय व श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. शिवानंद जाधव यांनी वृक्षारोपणाचे महत्त्व सांगत प्रत्येकाने आपल्या घरासमोर अथवा शेतात कमीत कमी दोन झाडे लावून राष्ट्रहिताच्या कार्यात खारीचा वाटा उचलावा असे आवाहन केले. याप्रसंगी वड, नारळ, फणस, आंबा आदी झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी उपस्थित प्रा. डॉ. शिवानंद जाधव, राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा. मोहसीन शेख, प्रा. भारत मेंगडे, प्रा. आदिनाथ खेडकर, प्रा. किरण खेडकर, प्रा. गोलेकर मॅडम, विद्यार्थी वर्ग आदी मोठ्या संख्येत उपस्थित होता. संस्थेचे सचिव डॉ.महेश गोलेकर यांनी रासेयो विभागाद्वारे आयोजित करण्यात आलेल्या वृक्षारोपण कार्यक्रमाचे कौतुक केले.

# फरक देयके ऑनलाईन करण्यास ०५ ऑक्टोबर पर्यंत मुदतवाढ - मराठवाडा शिक्षक संघाच्या मागणीस यश.

**जालना प्रतिनिधी :-**

जालना दिनांक 25 सप्टेंबर: राज्यातील खाजगी अनुदानित शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची फरक बीले दाखल करण्यासाठी दिलेला टॅब बंद असल्याने विहित मुदतीत फरक देयके ऑनलाईन दाखल करण्यात आलेली नाहीत त्यामुळे फरक देयके ऑनलाईन करण्यास मुदतवाढ देण्यात यावी अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम यांनी मुख्यमंत्री व शालेय शिक्षण मंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली होती त्याची दखल घेत फरक देयके ऑनलाईनकरण्यास 05 ऑक्टोबर पर्यंत मुदतवाढदेण्यात आली आहे.





याबाबत मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम यांनी दिलेल्या प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे की, राज्यातील खाजगी अनुदानित शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन व इतर देयके शालार्थ प्रणालीद्वारे ऑनलाईन पद्धतीने अदा केली जातात. फरक देयकेही ऑनलाईन पद्धतीने दाखल करण्याचे आदेश शालेय शिक्षण विभागाने दिले त्यासाठी 25 सप्टेंबर पर्यंत मुदत देण्यात आली होती. परंतु टॅब दिल्या पासून 'साईट बंद' होती, टॅब ओपनच होत नव्हता. त्यामुळे फरक देयके दाखल करण्यात अडचणी येत होत्या. मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव यांनी मुंबईत शिक्षण आयुक्त सुरज मांढरे यांची भेट घेऊन ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली होती.

मराठवाडा शिक्षक संघाच्या निवेदनाची दखल घेत फरक देयके ऑनलाईन दाखल करण्यास 05 ऑक्टोबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्याबद्दल मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम यांनी मुख्यमंत्री व शालेय शिक्षण मंत्री यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# उमापूर फाटा येथे चकलांबा पोलिसांची पुन्हा एक कारवाई

## एका रिक्षातून आठरा तलवारी जप्त करुन एकाला अटक; आठरा हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त..!

गेवराई,लोक इच्छा: चकलांबा पोलिस ठाणे हद्दीतील दूरक्षेत्र उमापुर पोलिस चौकीची हद्दीत उमापुर फाटा येथील एक ईसाम रिक्षात गेवराईकडे आठ तलवारी घेऊन जात असल्याची माहिती गूप्त बातमीदाराने चकलांबा पोलिसांना दिली तसेच चकलांबा पोलिसांनी सदरचा रिक्षा व एकजन याला ताब्यात घेतले आहे तसेच या कार्यवाईत 18 अंदाजे हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याची माहिती चकलांबा पोलिस ठाण्याचे सपोनि नारायण एकशिंगे यांनी दिली आहे. सदरची कार्यवाई (दि 24 सप्टेंबर ) रोजी साडे सहाच्या दरम्यान केली आहे. याबाबद सविस्तर माहिती अशी की,बीड पोलिस अधीक्षक यांच्या आदेशानुसार कायदा व सुवेस्थेला बाधा आणनाऱ्या ईसमा विरूद्ध कडक कार्यवाईचे आदेश दिले असल्याने आज गोपनिय बातमीदाराने चकलांबा पोलिसांना एम एच 16 एसी 416 या रिक्षात एकजन आपल्या अर्थिक फायद्यासाठी आठ तलवारी गेवराईकडे घेऊन जात असल्याची माहिती दिली तसेच त्यावरून चकलांबा पोलिसांनी सदरचा रिक्षा



व चालक व त्यातील एक प्रवासी याला ताब्यात घेऊन विचारपुस केली असता त्याने त्यांचे नाव रतन देवराव पवार ( वय 43 वर्ष ) असे सांगितले तसेच तलवारी बाबद परवाना असल्याचे विचारले असता त्याच्याकडे कुठलाही परवाना मिळून आला नाही तसेच एक रिक्षा वरील एकास



पोलिसांनी ताब्यात घेतले असून या प्रकरणी गून्हा दाखल करण्याची प्रक्रीया चकलांबा पोलिसांत सुरू असून सदरची कार्यवाई चकलांबा ठाणे प्रमुख सपोनि नारायण एकशिंगे यांच्या मार्गदर्शनाखी पोउपनि अंनता तागडे, पोअ तूकाराम पवळ, पोशी विनोद सुरवसे, यांनी केली आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार २६ सप्टेंबर २०२४
https://lokaarambh.com



# वाईट झालं की मला लय शिव्या पडतात धनंजय मुंडे असं का म्हणाले?

## कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी केलेल्या एका विधानामुळे सभागृहात एकच हशा पिकला.

"राज्यात पाऊस कमी पडो की जास्त पडो, अथवा विमा अन अनुदान उशिरा मिळो, शिव्या या कृषी मंत्र्याला खाव्या लागतात. त्यामुळे मला रोज रात्री उचक्या येतात", असं वक्तव्य राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी केलं आहे. कृषी खातं हे साधंसुधं नाही, हे सांगताना चांगलं झालं तर लोक साधं कौतुकही करत नाहीत. पण वाईट झालं की शिव्यांची लाखोली वाहतात, असं धनंजय मुंडे म्हणताच सभागृहात एकच हशा पिकला. पुण्यातील खेड-आळंदी विधानसभेत विकास कामांच्या लोकार्पण सोहळ्यात धनंजय मुंडे बोलत होते. तुम्ही कशाला कृषी मंत्री झालात, असं मला इन्शुरन्स कंपन्या म्हणत असल्याचंही धनंजय मुंडे म्हणाले. शेतकऱ्यांना कितीही दिलं तरी ते कमीच आहे, असंही मुंडे यावेळी म्हणाले. तसेच लाडकी बहीण योजनेवर टीका करणाऱ्या विरोधकांवरही मुंडेंनी तोंड सुख घेतलं. काहीही झालं तरी सत्ता आमचीच येणार, तेव्हा कृषीमंत्री पद मला मिळावं यासाठी आमदार दिलीप मोहितेंनी पाठपुरावा करावा, अशी सादही धनंजय मुंडेंनी यावेळी घातली. या कार्यक्रमानंतर मुंडे यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी अनेक मुद्द्यांवर प्रतिक्रिया दिली. राज्यात परतीच्या पावसाने नुकसान, मदत कधी? राज्यभर मोठ्या प्रमाणात पाऊस होतोय. या पावसामुळे अनेक ठिकाणी नुकसान झालंय. 15 दिवसांपूर्वी



मराठवाड्यातील काही भाग आणि पूर्व विदर्भात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं. त्याठिकाणी मदत देण्याचा निर्णय झाला. 300 कोटींचा निधी देण्यात आला. आता पुण्यात ज्या-ज्या ठिकाणी पावसामुळे नुकसान झालंय, तिथले पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. तिथंही लवकरचं आर्थिक मदत केली जाईल, अशी माहिती धनंजय मुंडे यांनी यावेळी दिली.

## मनोज जरांगे यांच्या प्रश्नावर काय म्हणाले?

यावेळी धनंजय मुंडे यांनी मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांच्या प्रश्नावरही उत्तर दिलं. "त्यांची तब्येत व्यवस्थित नाही. आधीच काही जिल्ह्यातील सामाजिक सलोखा पूर्णपणे संपलेला आहे, तो पूर्ववत करणं गरजेचं आहे. त्यांची तब्येत पाहता, त्यांनी उपोषण थांबवलं, या गोष्टी सरकार सकारात्मक घेत आहे", अशी प्रतिक्रिया धनंजय मुंडे यांनी दिली.

## 30 सप्टेंबर रोजी भ्रष्टाचार निर्मुलन समिती बैठक

बीड, दि 25:- जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समिती बीड तथा जिल्हाधिकारी बीड यांच्या अध्यक्षतेखाली दि. 30 सप्टेंबर 2024 रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. बीड जिल्हयातील शासकीय कर्मचा-याविरुध्द प्राप्त होणा-या तक्रारींबाबत पाठपुरावा करण्यासाठी जिल्हास्तरीय भ्रष्टाचार समिती स्थापन करण्यात आली असून त्याअनुषंगाने नागरिकांनी शासकीय अधिकारी, कर्मचा-याविरुध्द भ्रष्टाचारासंबधी तक्रार असल्यास जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीसमोर व्यक्तीशः उपस्थित राहून लेखी स्वरुपात मांडाव्यात सदर तक्रारीसोबत पुरावे जोडले गेले नसल्यास अशा तक्रारी घेतल्या जाणार नाहीत, असे सदस्य सचिव जिल्हा भ्रष्टाचार निवारण समिती तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

## कु.अस्मिता माऊली सुरवसे हिने मिळवला पुणे येथे MBBS साठी प्रवेश





शेलापुरी येथील माऊली सुरवसे यांच्या कन्या कु.अस्मिता माऊली सुरवसे हिने कठोर परिश्रमाने पुणे येथे MBBS साठी प्रवेश मिळवला आहे. आज माजलगांव मतदार संघाचे नेते मा.रमेशराव आडसकर साहेब यांनी तिचा सत्कार करून तिच्या या यशस्वी प्रवासाचे कौतुक केले. तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या आणि तिने अधिक प्रगती करून गावाचे नाव उज्ज्वल करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. या वेळी त्यांच्या बरोबर उपस्थीत शहराध्यक्ष. अँड. सुरेशराव दळवे,अनंतराव शेंडगे, प्रमोदजी शेजुळ, छबन घाडगे.व सहकारी.!!

## सोयगाव तालुक्यात मुसळधार पाऊस:पिकांना फटका

सोयगाव सह तालुक्यात बुधवारी सकाळी सात ते दहा वाजेपर्यंत तीन तास संततधार पाऊस झाला त्यामुळे पिकांना नुकसानीचा फटका बसला आहे दरम्यान सप्टेंबर महिन्यात च दोनदा झालेल्या मुसळधार पावसाने खरिपाच्या पिकांची वाट लागली आहे त्यामुळे सोयगावला शेतकरी हवालदिल झाले आहे मात्र महसूल व कृषीच्या संयुक्त पथकांनी पिकांच्या नुकसानी कडे शासनाच्या निकषांवर दुर्लक्ष केले आहे.सोयगाव तालुक्यात बुधवारी तीन तास संततधार पावसाने कपाशी व मक्याच्या पिकांना फटका बसला आहे मका पिके कापणीवर आलेली असतांना पावसात भिजून खराब झाली आहे. कपाशीच्या पिकांमध्ये पाणी साचून कापसाच्या कैऱ्या काळवंडून गेल्या तर फुटलेला कापूस गळून पडला आहे बनोटी भागात कापसाच्या वाती झालेल्या आहे त्यामुळे कापूस उत्पादक शेतकरी हवालदिल झाले आहे दरम्यान सप्टेंबर च्या पहिल्या आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे तालुक्यातील ७२ गावांमध्ये १५,७५७ हेक्टरवर पिके ३३ टक्क्यांच्या अधिक बाधित झालेली आहे त्यामुळे या ३३ टक्क्यांच्यावर नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे अद्यापही हाती घेतलेली नसतांना बुधवरी अचानक झालेल्या तीन तासांच्या संततधार पावसाने पुन्हा नुकसान झाले आहे तिडका बोरमाळ तांडा तितुर हनुमंत खेडा वडगाव शिंदोल या गावात झालेल्या वादळी वाऱ्याने व मुसळधार पावसामुळे कापशी पिके आडवी झाली आहे त्यामुळे या सहा गावांना मोठे नुकसान झाले आहे.

## बार्टी कडूनपंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती: एकात्म मानववादाच्या विचारांचा पुन्हा आविष्कार

(प्रतिनिधी)

वसमत:डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन वप्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था प्रकल्प अधिकारी सिध्दार्थ गोवंदे याच्या मार्गदर्शन खाली समतादूत आळणे मिलिंद सर्वप्रथम पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी खोकले साहेब हे होते. प्रमुख पाहुणे




भैयासाहेब डुकरे होते. पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती दरवर्षी २५ सप्टेंबरला साजरी केली जाते. पंडित दीनदयाळ उपाध्याय हे भारतीय जनता पक्षाचे (पूर्वीचे भारतीय जनसंघ) एक प्रमुख विचारवंत, राजकीय नेते, आणि समाजसेवक होते. त्यांची "एकात्म मानववाद" ही विचारधारा भारताच्या राजकारणात विशेष महत्त्वाची ठरली आहे. एकात्म मानववाद हे भारतीय संस्कृती, पारंपरिक मूल्ये आणि आधुनिक विकास या संकल्पनांचा समन्वय आहे.यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुणे शहरात मुसळधार पाऊस

----जागो जागी शहरात नद्याचे स्वरूप तर शहराची वाहतूक ठप्प पुणे शहरासह उपनगरात अतिमूसळधार पाऊस पडल्यामुळे रस्त्यांना नद्याःचे स्वरूप आले होते जागो जागी वाहतूक ठप्प झालेली दिसत होती• तर पंतप्रधान यांचा पुणे दौरा दि• २६ रोजी आहे यात एसपी कॉलेज ग्राऊंडवर यांची सभा होणार आहे पावसामुळे हे मैदान चिखलमय झालेले दिसत होते•

पुणे शहराला अतिमुसळधार पावसाने झोडपले पाऊस ईतका जोरात होता की रस्ते जलमय झाले



होते रस्त्यांनवर पाणी तूंबल्यामूळे वाहनचालकांचे हाल झालेले दिसत होते एक एक तास वाहणे जागचे हलत नव्हते चाकर मान्यांची घरी जाण्याची वेळ आणि पावसाचा कहर शहरात दिसत होता शहरात तीन दिवसा पासून पाऊस सुरू होता •



लोकनेते बदामरावजी पंडित यांच्या निवासस्थानी गेवराई येथे आज माढा लोकसभे चे खासदार #धैर्यशील_दादा_मोहिते पाटील यांनी सदिच्छा भेट दिली असता त्यांचे सत्कार करुन आदरणीय माजी मंत्री लोकनेते बदामराव आबा पंडित, युधाजीत दादा पंडीत, युवानेते यशराज भैय्या पंडित, यांनी स्वागत केले..! यावेळी सर्व पदाधिकारी उपस्थित होते..!

## गुरुकृपाचा कमवा आणि शिका योजनेतून मिळणारा अनुभव लाख मोलाचा -उमेशकुमार जेथलिया

### औषधनिर्माता दिनानिमित्त गुरुकृपा च्यवनप्राशचे वितरण

माजलगाव / प्रतिनिधी

गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी ने औषधनिर्माणशास्त्राच्या विद्यार्थ्यांना कमवा आणि शिका योजनेच्या माध्यमातून व्यवहारिक आयुष्याचा अनुभव घेण्याची चांगली संधी उपलब्ध करून दिली असून यातून मिळणारा अनुभव लाख मोलाचा असणार आहे असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघांचे तालुकाध्यक्ष उमेशकुमार जेथलिया यांनी व्यक्त केले. औषधनिर्माता दिना निमित्त मोंढा मैदान येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष गुरुकृपा इन्स्टिट्यूट चे प्राचार्य अमित बिंदू पत्रकार विष्णू उगले, परमेश्वर सोळंके, अरविंद ओव्हाळ, अमर साळवे, बाळासाहेब अडागळे उपस्थित होते. जागतिक औषधनिर्माता दिनानिमित्त कमवा व शिका योजने अंतर्गत गुरुकृपा इन्स्टिट्यूट च्या विध्यार्थी वर्गाने शास्तरोक्त पद्धतीने स्वतः बनवलेले च्यवनप्राश चे



वितरण उमेशकुमार जेथलिया यांच्या हस्ते करण्यात आले तसेच पर्यावरण जनजागृती अभियानाचा भाग म्हणून बायोडिग्रीदेबल वस्तू वापरण्याविषयीं जनजागृती रॅली काढण्यात आली.यावेळी पुढे बोलताना जेथलिया यांनी पर्यावरण जनजागृती विषयी गुरुकृपा इन्स्टिट्यूट ने समजूपायोगी कार्य हाती घेतल्याबद्दल कौतुक करतानाच भावी आयुष्यात येणाऱ्या अडचणीवर मात करण्याच्या दृष्टीने कमवा आणि शिका योजना फायद्याची असल्याचे सांगितले.

यावेळी शहरातून औषध निर्माता दिनानिमित्त रॅली काढण्यात आली

## आमदारांच्या टक्केवारीमुळेच दर्जाहीन कामे; जालना रोड गेला पाण्याखाली

### डॉ.योगेश क्षीरसागरांचा आरोप; नागरिकांना होत असलेल्या त्रासाला आमदार जबाबदार

### नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी

बीड शहरातील जनता गॅरेजपासून साई पॅलेसपर्यंत दुकानांमध्ये पाणी शिरले आहे. त्यामुळे अनेक व्यवसायिकांचे नुकसान झाले आहेत. या नुकसानीचे पंचनमाने करून प्रशासनाने आर्थिक मदत द्यावी अशी मागणी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली आहे.

बीड (प्रतिनिधी)

दि.25 : गत पाच वर्षांच्या कार्यकाळात बीडच्या आमदारांना एक काम धड करता आले नाही. जे केले त्या कामांमध्ये ठेकेदारांकडून वाट्टेल तितकी टक्केवारी घेतल्याने कामे दर्जाहीन झाली. याचा उत्तम नमुना म्हणून जालना रोडच्या कामाकडे पाहता येईल. एका पावसात शहरातील हा



रस्ता पाण्याखाली जात असून नागरिकांना होत असलेल्या त्रासाला बीडचे आमदारच सर्वस्वी जबाबदार आहेत, असा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केला आहे.



पत्रकात पुढे म्हटले आहे की, बीड शहरातून जाणाऱ्या जालना रोडवरील जनता गॅरेजपासून साई पॅलेसपर्यंत करण्यात आलेला रस्ता अतिशय निकृष्ट दर्जाचा झालेला आहे. हे काम आमदारांनी श्रेय लाटण्यासाठी हस्तक्षेप करून घाईघाईत करून घेतले. परंतु, वाट्टेल तितकी टक्केवारी घ्यायची सवय झाल्याने या कामात डिव्हायडर उभारण्यात आले नाही. दुतर्फा नाल्या करण्यात आल्या नाहीत. परिणामी, झालेल्या पावसाने पाणी व्यवसायिकांच्या दुकानांसह घरांमध्ये शिरले. डिव्हायडर नसल्याने अनेकदा गाड्या स्लिप होऊन अपघात होत आहेत. नागरिकांना होत असलेला त्रास आमदारांनी काम करताना केलेल्या हस्तक्षेपामुळे होत आहे. त्यांच्या काम करण्याच्या चुकीच्या पद्धतीची फळे बीडवासियांना भोगावी लागत आहेत, असेही डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

## महाराष्ट्रात मुसळधार पाऊस, कुठे रेड अलर्ट तर कुठे ऑरेंज अलर्ट

### मुंबईसह ठाणे, पुणे आणि रायगडमध्ये मुसळधार पाऊस होत आहे.

प्रतिनिधी,

जवळपास दोन आठवड्यांपासून दडून बसलेला पाऊस पुन्हा एकदा सुरु झाला आहे. महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये मुसळधार पाऊस सुरु आहे. अनेक ठिकाणी उद्या ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. हवामान खात्याने म्हटले आहे. भारतीय हवामान खात्याने बुधवारी मुंबई, ठाणे, रायगड आणि रत्नागिरी साठी रेड अलर्ट दिला होता. तर पालघरसाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला



आहे. गुरुवारी पालघरसाठी रेड अलर्ट तर मुंबई, ठाणे आणि रायगडसाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. मुंबई हवामान विभागाचे संचालक सुनील कांबळे यांनी सांगितले की, बंगालच्या उपसागरावर चक्रीवादळ निर्माण झाल्यामुळे पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुंबईत पावसाचा जोर वाढू शकतो.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

गुरुवार २६ सप्टेंबर २०२४





# मराठा समाजाच्या मागण्या योग्य,पण ;मराठा आरक्षणाबद्दल देवेंद्र फडणवीसांचे स्पष्ट विधान

**मराठा समाजाला त्यांचे हक्क मिळायला हवं, तसेच त्यावेळी समाजात कुठेही दुफळी निर्माण होऊ नये. या दृष्टीने आमचा सातत्याने प्रयत्न आहे, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.**

## “दुर्दैवाने त्यानंतर ते टिकू शकले नाही”

“दरवर्षी अण्णासाहेब पाटील यांची जयंती साजरी करण्यासाठी आपण इथे जमतो. मराठा समाजाची चळवळ उभी झाली ती अण्णासाहेब पाटील यांच्या निमित्ताने उभी झाली. मी मुख्यमंत्री असताना मराठा समाजाला आरक्षण दिलं होतं. देशात मराठा आरक्षण हे एकमेव आरक्षण होते, जे उच्च न्यायालयात आपण टिकवून दाखवलं. जोपर्यंत मी मुख्यमंत्री होतो, तेव्हा सर्वोच्च न्यायालयातही ते टिकलं. पण दुर्दैवाने त्यानंतर ते टिकू शकले नाही”, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.



**मुंबई /प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून मराठा समाज हा सातत्याने आरक्षणाची मागणी करत आहे. त्याच पार्श्वभूमीवर आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी एक मोठे वक्तव्य केले आहे. “मराठा समाजाला त्यांचे अधिकार आणि आरक्षण हे मिळायलाच हवं, असं आमच्या सरकारचे वचन आहे. मराठा समाजाच्या मागण्या या योग्य आहे. त्यातून मार्ग काढण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत”, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. ते नवी मुंबईत बोलत होते. देवेंद्र फडणवीस यांनी नुकतंच स्व. आमदार अण्णासाहेब पाटील यांची 91 वी जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या एका कार्यक्रमाला हजेरी लावली. यावेळी गुणवंत कामगार पुरस्कार वितरण समारंभ आणि माथाडी कामगारांचा भव्य मेळावा पार पडला. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी मराठा आरक्षणाबद्दल एक मोठे वक्तव्य केले. “समाजात दुफळी निर्माण होऊ नये म्हणून प्रयत्न” “कारण मराठा समाजाने विविध समाजाचे नेतृत्व केलं आहे. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचे १८ पगड जातीचे मावळे एकमेकांविरोधात उभे आहेत, अशाप्रकारचे चित्र उभं राहणं हे महाराष्ट्रासाठी योग्य नाही. ते उभं होऊ नये, असा सर्वांचा प्रयत्न आहे. त्यामुळे आमच्या सरकारचे वचन आहे की मराठा समाजाला त्यांचे अधिकार आणि आरक्षण हे मिळायलाच हवं. पोलीस भरतीतही मराठा आरक्षण दिले. मराठा समाजाला त्यांचे हक्क मिळायला हवं, तसेच त्यावेळी समाजात कुठेही दुफळी निर्माण होऊ नये. या दृष्टीने आमचा सातत्याने प्रयत्न आहे”, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.



महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी वर्कर्स युनियन मध्ये महापारेषण चे सीनियर ऑपरेटर श्री राजेंद्र जाधव यांचा जाहीर प्रवेश व त्यांना बीड महापारेषांचे विभागीय अध्यक्ष म्हणून पद निवड करण्यात आले, व यावेळी त्यांचा सत्कार करताना श्री कार्याध्यक्ष डी.बी. बोर्डे साहेब श्री महाले साहेब नेटके साहेब इकबाल खान साहेब सर्व कॉम्रेड्स कार्यकर्ता...

## जीवनाचे समग्र तत्त्वज्ञान मांडणारे दीनदयाळ उपाध्याय यांचा आदर्श युवकांनी अंगीकारावा – डॉ. कमलकिशोर लड्डा

**माजलगाव प्रतिनिधी**

दिनांक २५/०९/२०२४ श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना अभिवादन येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ विभागाकडून पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना त्यांच्या जयंती प्रसंगीचे औचित्य साधून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगीच्या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. कमलकिशोर लड्डा म्हणाले की, युवकांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या समग्र विचारांचा आदर्श आपल्या जीवनामध्ये अंगी करावयास हवा. कारण त्यांचे संपूर्ण जीवन हे खूप संघर्षमय असे राहिले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघामध्ये कार्य करत असताना आजची जी भारतीय जनता पार्टी आहे तो पूर्वीचा जनसंघ याला विकसित करण्याचे कार्य खऱ्या अर्थाने पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी अतिशय परिश्रमपूर्वक केले आहे. अतिशय शालीन स्वभावाचे, बोलण्यात मृदुता, आणि बिडस्त प्रतिभावंत, चिंतक असे अभिजात व्यक्तिमत्व म्हणजेच पंडित दीनदयाळ उपाध्याय होय. आपल्या सांस्कृतिक परंपरेत जगाला देण्यासारखे काय आहे याचा विचार करून जागतिक प्रगतीच्या कार्यात सहभागी झाली पाहिजे. गेली हजार वर्षे आपले संपूर्ण आयुष्य हे स्वातंत्र्य लढ्यात व स्वसंरक्षणात गुंतले असल्याने जगातील इतर राष्ट्रांच्या बरोबरीने आपण उभे राहू शकलो नाहीत तर आपले भविष्य हे खूप अंधकारमय राहील असा विचार ते नेहमीच ते मांडत राहत. अशा या व्यक्तीचा आदर्श युवकांनी त्यांचे तत्त्वज्ञान वाचून, त्यांची वेगवेगळी पुस्तके वाचून आपल्या जीवनात अंगीकारावा असे ते म्हणाले.



कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करताना उपप्राचार्य डॉ.युवराज मुळये म्हणाले की, भारतीय जीवनाचे चिंतन परंपरा व तत्त्वज्ञान यांचा संपूर्ण विचार आपल्या एकात्म मानव विचार दर्शनामध्ये सापडतो हे एकात्म मानववादाचे तत्त्वज्ञान आपल्या जीवनामध्ये अंगीकारायचे हा विचार पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनीच जगाला संपूर्ण देशाला सांगितला. त्यांच्या वेगवेगळ्या समाज व राष्ट्रकार्याचे आजही समाजात स्वागतच होत आहे असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे समन्वयक डॉ.सुनील पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ जिजाराम बागल यांनी केले. तर आभार डॉ. गंगाधर उषमवार यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थीनी यांची उपस्थिती होती.

# परळीचा आमदार आपलाच असेल:खा.बजरंग सोनवणे

## राजाभाऊ फडसह भाजप,राष्ट्रवादी,शिंदे गटाचे कार्यकर्ते शरदचंद्र पवार गटात

**बीड/प्रतिनिधी** बीडच्या जनतेने लोकसभा निवडणूकीत इतिहास घडविला. त्यामुळे माझ्यासारखा सामान्य माणूस खासदार झाला. अगदी त्याचप्रमाणे येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीतही परळी मतदार संघात त्याची पुनरावृत्ती घडवून आणायची आहे.त्यासाठी राजाभाऊ फड आणि पक्षप्रवेश केलेल्या असंख्य कार्यकर्त्यांना सोबत घेवून हा बदल निश्चित घडवून येईल. परळीचे राजकारण आज घडीला दबाव तंत्राचे आहे. त्यामुळे जनताही या दबाव तंत्राला कंटाळली आहे.परळी मतदार संघातील कार्यकर्त्यांचा आजचा हा पक्षप्रवेश सोहळा उद्याच्या विधानसभा निवडणुकीत पोषक ठरणार आहे. यावेळी खा. बजरंग सोनवणे असेही म्हणाले की, अजून बरेच आजी-माजी पक्षप्रवेश करणार आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्यातल्या सहाही मतदार संघातील चित्र वेगळे राहणार असून पुन्हा एकदा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे वर्चस्व असेल. असे सुतोवाचक विधान खा.बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केले.



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्यावर विश्वास ठेवून परळी मतदार संघातील असंख्य कार्यकर्त्यांनी बुधवार (दि.25) रोजी मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यालयात शरद पवार यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश केला. यावेळी खा.बजरंग सोनवणे म्हणाले की, ज्यांचा आज पक्षप्रवेश होतो आहे, ती असामी साधीसुधी नाही. गेल्या 25 वर्षांपासून कन्हेरवाडी ग्रामपंचायत त्यांच्या ताब्यात आहे.सरपंच संघटनेचे अध्यक्ष म्हणून कार्यकरत होते.परळी मार्केट कमिटीत मोठ्या मताधिक्याने संचालक म्हणून निवडून आलेले आहेत.यापूर्वी रासपचे युवक प्रदेश अध्यक्ष होते. कोणतीही अट न घालता त्यांनी आज राष्ट्रवादी शरद पवार गटात आपल्या असंख्य कार्यकर्त्यांना सोबत घेऊन प्रवेश केला आहे. त्यांचे व त्यांच्या सहकाऱ्यांचे आम्ही मनःपूर्वक अभिनंदन आणि स्वागत करतो. परळी मतदार संघातील एखादा कार्यकर्ता प्रवेश करत असेल तर त्याला फोन करुन दाब दिला जातो.खरंतर परळीच्या नेत्यांची ही जुनी खोड आहे. शरद पवार यांचा नाद करायचा नाही. कारण विधानसभा निवडणूकपूर्वीच बीडच्या जनतेने लोकसभेत ज्याला त्याची जागा दाखवून दिली आहे.लोकसभेच्या निवडणुकीत मत केंद्रावर कोण कसे वागले हे अवघ्या महाराष्ट्राला माहित आहे. आम्ही शांत आहोत जर एकएक माहिती बाहेर काढली तर सुळो की पळो होईल.असा टोलाही खा.बजरंग सोनवणे यांनी परळीच्या नेत्याचे नाव न घेता लगावला. या पक्षप्रवेश सोहळ्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष शरदचंद्र पवार,खा. फौजिया खान, राजेंद्र पवार, संजीवनी देशमुख यांच्यासह राष्ट्रवादीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## यांनी केला जाहीर प्रवेश

परळी मतदार संघातील राजकीय वलय असलेले राजाभाऊ फड यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटात जाहीर प्रवेश केला. त्यामध्ये भाजपाच्या बीड जिल्हा सरचिटणीस मंगलताई सोळंके, भाजप माजी जिल्हा परिषद सदस्य प्रमोद किरवले, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा संघटक डॉ.जान शेख, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे उद्योजक विक्रम देशमुख,भाजपच्या नागापूरच्या माजी सरपंच अश्विनी सोळंके, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे पद्माकर लहाने, माजी सरपंच कुसुमताई शिंदे, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे माजी सरपंच सतीश फुंडकर, माजी उपसरपंच दत्तात्रय कदम यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटात प्रवेश केला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com